# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

प्रस्तावना

**विषय:-** नगर रचना अधिकारी, विकास योजना भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.१४० दि.१३/०७/२०२३ नुसार प्राप्त शहराची प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करणे बाबत...

**संदर्भ:-** नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांचे पत्र क्र. १४० दि.१३/०७/२०२३

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ **(यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केलेला आहे.)** चे कलम २३(१) अन्वये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने त्याच्या क्षेत्रापुरती प्रारूप विकास योजना (**"उक्त प्रारुप विकास योजना"**) तयार करण्याचा इरादा सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.४५६, दिनांक ०८/०२/२०२२ व ठराव क्र. ५०४, दिनांक २७/०४/२०२२ अन्वये जाहिर करण्यास मान्यता दिलेली आहे व त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक १०-१६ मार्च २०२२ रोजी प्रसिध्द झाली असून दि.१६-२२ जून २०२२ रोजी त्यास शुध्दीपत्रक निर्गमित केलेले आहे.

मा.सह संचालक, नगररचना, कोंकण विभाग, नवी मुंबई यांच्या पूर्वमान्यतेने आणि उक्त अधिनियमाच्या कलम २४ अन्वये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने दिनांक २३/०५/२०२२ चे आदेशान्वये सहाय्यक संचालक, नगर रचना, विकास योजना विशेष घटक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांची उक्त प्रारूप विकास योजनेसाठी "**नगर रचना अधिकारी**" म्हणून नेमणूक केलेली आहे.

उक्त प्रारूप विकास योजनेच्या अनुषंगाने उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये "नगर रचना अधिकारी" यांनी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील क्षेत्राचे सर्वेक्षण करून, व त्यानुसार अस्तित्वातील जमीन वापर नकाशा (ELU) तयार करून, सदर नकाशा हा विहित मुदतीत दि.३०/०८/२०२२ रोजी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेला आहे व तो नोटीस बोर्डावर जनतेच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

उक्त प्रारूप विकास योजना तयार करतांना सार्वजनिक सुविधांकरीता शहराची सन २०३७ ची संभाव्य लोकसंख्या १३,४९,५८६ व सन २०४७ ची लोकसंख्या १६,०९,८७८ विचारात घेऊन आणि नियोजन मानांकनानुसार (Planning Standard) एकूण २७४ आरक्षणे प्रारूप विकास योजनेत प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. प्रारूप विकास योजना नकाशा व प्रारूप विकास योजना अहवालसह मंजुरीस्तव व जनतेच्या सुचना / हरकतीसाठी उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करणेकरीता मंजूरी मिळणेसाठी नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना , विकास योजना विशेष घटक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांचे पत्र क्र.१४० दि.१३/०७/२०२३ अन्वये महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. सद्या मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नाहीत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा

कार्यभार प्रशासक या नात्याने आयुक्त, भि.नि.श.म.न.पा. पाहत आहेत. विषयांकित प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** २६४ **दि.** ५/१० **/२०२३**

१) नगर रचना अधिकारी यांनी हस्तांतरीत केलेल्या भिवंडी निजामपुर शहराचा प्रारूप विकास योजना नकाशा, अहवाल आणि तद्नुषंगिक कागदपत्रांचे आजच्या सभेत अवलोकन केले असता, तो सर्वसाधारण योग्य असल्याचे, दिसुन येत आहे. त्यामुळे, प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) नुसार प्रसिध्द करण्यास या ठरावाव्दारे मंजूरी देत आहे.

२) अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारूप विकास योजना प्रसिद्ध झाल्यानंतर प्राप्त होणा-या सूचना / हरकतदारांना सुनावणी देण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २८(२) अन्वये गठीत होणा-या नियोजन समितीवर सद्यस्थितीत मा. महासभा अस्तित्वात नसल्याने प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांची सदस्य म्हणून नेमणूक करण्यास देखील मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

३) उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने पुढिल प्रशासनिक कार्यवाही करण्यासाठी आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

(अजय विलास वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी नि. श. महानगरपालिका, भिवंडी.

ि
ि